MHRT050000152019 **नियमित फौजदारी खटला क्र. ०२/२०१९**

**महाराष्ट्र शासन**

**वि.**

**वैभव सदानंद खेडेकर वगैरे १६**

**निशाणी १10 खालील आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज आरोपी नं. ५ रहिम युसुफ सहिबोले दि.१९.०१.२०२५ ते दि.२५.०१.२०२५ या कालावधीमध्ये थायलंड येथे जाण्यासाठी परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. अर्जातील कथनांनुसार ते खेड येथील नागरीक असून त्यांनी न्यायालयाच्या परवानगीने पासपोर्ट काढलेला आहे. प्रस्तुत आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता, १४३,१४७,१४९,३४१,५०६ अन्वये गुन्हा तोहमत आहे. सदरचे प्रकरण हे आरोपी क्र. १,२ व ४ यांचे पकड वॉरंट रिपोर्ट येणेवर प्रलंबित आहे. आरोपी क्र. ५ यांना दि.१९.०१.२०२५ ते दि.२५.०१.२०२५ या कालावधीमध्ये थायलंड येथे कामानिमित्त जाण्याचे आहे. त्यामुळे त्यांना कामाकरता दि.१९.०१.२०२५ ते दि.२५.०१.२०२५ या कालावधीत थायलंड येथे जाण्याकरीता या न्यायालयाच्या परवानगीसाठी अर्ज दाखल केला आहे.

३. प्रस्तुत अर्जावर सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे म्हणणे मागविण्यात आले. सदर अर्जावर त्यांनी म्हणणे दाखल करून अर्जास विरोध दर्शवला आहे. त्यांनी सदरचा अर्ज खोटा असुन अर्ज मंजुर झाल्यास आरोपी पुन्हा न्यायालयात उपस्थित राहणार नाही तरी,सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा असे म्हटले आहे.

४. अर्ज, म्हणणे व प्रकरणाचा अभिलेख पाहिला. दोन्ही बाजूच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुत आरोपीविरुद्ध भा.द.स. १४३,१८८,सह कलम १४९ तसेच साथीचा रोग प्रतिबंधक कायदा १८९७ मधील कलम २ व ३ तसेच कोवीड –१९ उपाय योजना २०२० चे कलम तसेच ११ अन्वये गुन्हा दाखल आहे. सदरचे प्रकरण हे आरोपींवर दोषारोप नोंदवणेवर व आरोपी क्र.२ व ४ हे यांचे पकड वारंट काढण्यावरती नेमण्यात आले आहे. आरोपीने सदर अर्जाच्या पृष्ठ्यर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. अर्जातील कथनांचा विचार करता आरोपीला दि.१९.०१.२०२५ ते दि.२५.०१.२०२५ या कालावधीमध्ये कामानिमित्त थायलंड येथे जायचे आहे. त्यानंतर आरोपी हा भारतात परत येणार आहे.

५. प्रकरणाचा मागील रोजनामा पाहता, आरोपी हा नेमले तारखेस हजर असल्याचे दिसून येते. आरोपी हा खेड येथील कायमचा रहिवासी असल्याचे त्याच्या पत्त्यावरून समजून येते. आरोपीला परदेशात जाण्याचा कालावधी पाहता त्या कालावधीमध्ये आरोपीच्या अनुपस्थितीत सदरचे काम प्रलंबित राहील असे दिसून येत नाही. आरोपीतर्फे वकीलांनी त्याच्या गैरहजेरीत काम चालवित असल्याचे युक्तीवादादरम्यान सांगितले आहे. आरोपीला परदेशात जाण्याचे कारण, कालावधी त्याचा कायमचा पत्ता पाहता तो परदेशात गेल्यास फरार होईल अशी शक्यता प्रथमदर्शनी दिसून येत नाही. आरोपीविरूध्द न्यायालयात फौजदारी खटला प्रलंबित आहे या कारणावरून त्याला परदेशात जाण्यापासून मज्ञाव करणे उचित ठरणारे नाही. सहा. सरकारी वकीलांनी आरोपीचे अनुपस्थितीबाबत वर्तविलेली शक्यता लक्षात घेता त्यास काही अटी व शर्ती घालून त्यास परवानगी देणे योग्य व न्यायोचित ठरेल असे मला वाटते म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. आरोपी नं.५ रहिम युसुफ सहिबोले यास दि.१९.०१.२०२५ ते दि.२५.०१.२०२५ या कालावधीकरीता थायलंड येथे जाण्याची परवानगी देण्यात येते.

३. आरोपीतर्फे वकीलांनी आरोपीच्या गैरहजेरीत कोणतीही सबब न सांगता प्रकरणाचे काम चालविण्याचे आहे.

४. आरोपीने परदेशातून आल्यानंतर लगेचच या न्यायालयात उपस्थितीबाबतचा अहवाल सादर करावयाचा आहे.

Digitally signed by MANISHA MAHADEO PATIL
Date: 2025.01.10 10:30:43 +0530

**(मनिषा म. पाटील)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**

**दिनांक– ०६.०१.२०२५** **(न्यायालय क्र.२) खेड, ता.खेड**

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | R.C.C. No. 02-2019 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original order. | | |
| Name of Stenographer | : | Smt.S.K.Kharat |
| Court Name | : | 2nd Jt. CJJD & JMFC, Khed |
| Date of Decision | : | 06/01/2025 |
| Order signed by Presiding Officer on | : | 06/01/2025 |
| Order uploaded on | : | 10/01/2025 |